**भूमीसंपादन, पुनर्वसन व पुनर्वसाहत करतांना वाजवी भरपाई मिळण्याचा आणि पारदर्शकतेचा हक्क अधिनियम 2013 च्या कलम 21(1)(4)अंतर्गत नोटीस.**

**क्र.कावि/अका/भुसं/उविअ/प्र-२/बेंडारा/2021/ 82**
**दिनांक - 3 / 02 /2021**

## -: जाहीर नोटीस :-

**मौजा — बेरडी ता. राजुरा**

ज्याअर्थी , समुचित शासन म्हणजे उपविभागीय अधिकारी तथा भुसंपादन अधिकारी राजुरा यांचे कार्यालयात भुमिसंपादन, पुनर्वसन व पुनर्वसाहत करतांना उचित भरपाई मिळण्याचा आणि पारदर्शकतेचा हक्क् अधिनियम २०१३ अन्वये बेंडारा मध्यम प्रकल्पाकरीता लागणारी जमीन सपांदनाचे प्रकरणात कलम १९ प्रसिध्दीची करण्यात आलेली आहे

आणि ज्या अर्थी सोबत जोडलेल्या परिशिष्टात नमुद केलेली जमीन बेंडारा मध्यम प्रकल्प या प्रयोजनाकरीता मौजा बेरडी ता राजुरा येथील आवश्यक असल्याने सदर जमिनीबाबत मोबदला / पुनर्वसन व पुर्नस्थापना याबाबत असलेल्या हितसंबंधाबाबत म्हणणे उपविभागीय अधिकारी तथा भुसंपादन अधिकारी राजुरा यांचे समोर दाखल करणे आवश्यक आहे.

सबब, सर्व संबधीत जमीन धारकांना कळविण्यात येते की, त्यांनी स्वत: / त्यांचे प्रतिनिधी/त्यांचे वकीलामार्फत त्यांचे म्हणणे त्यांना दिलेल्या वैयक्तिक नोटसमध्ये नमुद केलेल्या दिनांकाला उपविभागीय अधिकारी राजुरा यांचे कार्यालय येथे उपविभागीय दंडाधिकारी राजुरा यांचे समक्ष सादर करावे.

त्यांना असे कळविण्यात येते की, संपादनाखालील जमिनीसोबत असलेल्या त्यांचा हितसंबंध व मोबदला रक्कम तसेच हितसंबंधाच्या अनुषंगाने मोबदला मिळण्याबाबत त्यांच्या असलेल्या मागणीचा तपशिल व पुनर्वसन व पुनर्स्थापना करण्याबाबत त्यांची असलेली मागणी तसेच सयुक्त मोजणबाबत त्यांचा असलेला काही आक्षेप यावेळी सादर करता येईल.

त्यांना असेही कळविण्यात येते की, त्यांनी त्यांचे म्हणणे त्यांच्या अथवा प्रतिनिधीच्या स्वाक्षरीसह लेखी स्वरुपात दाखल करावे.

सहपत्र :- मौजा बेरडी येथील संपादन जमीनीचे परिशिष्ट

स्थ्ळ — राजुरा

दिनांक :-03/०२/२०२१

उपविभागीय अधिकारी तथा
भुसंपादन अधिकारी, राजुरा